# अपघातातील मृत्यूप्रकरणी ठेकेदार व अधिकाऱ्यांविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा- प्राजक्त तनपुरे

**राहुरी (तालुका प्रतिनिधी)–** नगर-मनमाड महामार्गावरील अपघातातील मृत्यूप्रकरणी दोषी ठेकेदार व अधिकाऱ्यांविरोधात तात्काळ सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून अटक करा, दोषींना सेवेतून बडतर्फ करा, सात दिवसात सदर कारवाई न झाल्यास नगर-मनमाड रस्त्यावर उतरून आंदोलन करू. यास प्रशासन जबाबदार राहील, असा इशारा माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी दिला आहे.



नगर-मनमाड महामार्गाची झालेली दुर्दशा तसेच आजपर्यंत अनेकांनी आपला जीव गमावल्याच्या निषेधार्थ काल सोमवार दि. ८ रोजी सकाळी राहुरी तहसील येथे दशक्रियाविधी मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी प्रशासनाच्या विरोधात रोष व्यक्त करताना माजीमंत्री तनपुरे बोलत होते.

माजी मंत्री तनपुरे म्हणाले, नगर- मनमाड महामार्गाची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. या रस्त्यावर खड्डे पडल्याने अपघाताची संख्या दिवसागणिक वाढत चालली आहे. यामध्ये आत्तापर्यंत अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे तर अनेकांना कायमचे अपंगत्व आले आहे. ठेकेदाराने अत्यंत निष्काळजीपणाने रस्त्याचे काम केले आहे. यामुळे जनतेच्या पैशाची मोठी नासाडी झाली आहे. या लोकांच्या मृत्यूला ठेकेदार व अधिकारीच कारणीभूत आहे. खा. निलेश लंके यांनी दोनवेळा या रस्त्यासाठी उपोषण केले. या अपघातास जबाबदार असणारे ठेकेदार व अधिकारी यांच्यावर कामात कसूर केल्याबद्दल सदोष मनुष्यवधानाचा गुन्हे दाखल करून तात्काळ अटक करण्यात यावा. जर गुन्हा दाखल होऊन अधिकारी बडतर्फ झाले नाही तर पुढील सात दिवसांमध्ये हजारोच्या संख्येने नगर-मनमाड महामार्गावर रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला. याप्रसंगी जि. प. माजी अध्यक्ष बाबासाहेब भिटे, काँग्रेसचे बाळासाहेब आढाव, विजय तमनर, ज्ञानेश्वर बाचकर, बाळासाहेब जाधव, ज्ञानेश्वर जगधने आदींनी मनोगत व्यक्त संताप व्यक्त केला.

यावेळी माजी नगराध्यक्ष अनिल कासार, सागर तनपुरे, गेणूभाऊ तोडमल, सुर्यकांत भुजाडी, प्रकाश भुजाडी, स्वप्नील भास्कर, सौरभ उंडे, दत्तात्रय येवले, शिवाजी वराळे, अमोल तनपुरे, रविंद्र आढाव, नंदकुमार तनपुरे, ॲड. राहुल शेटे, बाळासाहेब उंडे, नंदू तनपुरे, भारत भुजाडी, शहाजी जाधव, राजेंद्र बोरकर, संदिप सोनवणे, सचिन भिंगारदे, निलेश जगधने, प्रदिप पवार, वैभव जरे, रामदास बाचकर, सोन्याबापू जगधने, संतोष आघाव, महेश उदावंत, दिलीप गोसावी आदीसह नागरिक उपस्थित होते.

# छत्रपती संभाजी राजेंच्या फोटोची विटंबना चर्चेमुळे बेलापुरात तणाव

## घटनेचे सत्य पोलिसांनी केले उघड; अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील बेलापूर येथे ईद-ए-मिलाद निमित्त काढलेल्या मिरवणुकीदरम्यान धर्मवीर संभाजी राजेंच्या फोटोची विटंबना झाल्याची चर्चा पसरल्याने गावात काहीकाळ मोठा तणाव निर्माण झाला होता. त्यानुसार आक्रमक झालेल्या हिंदुत्ववादी संघटनांनी अशा समाजकंटकावर कारवाई करण्याची मागणी केली. मात्र पोलिसांनी घटनेचे सत्य समोर ठेवत विटंबना झाल्याची अफवा असल्याचे सांगत नागरिकांनी अशा अफवांना बळी पडू नये, असे आवाहन करीत अशा अफवा पसरवून सामाजिक वातावरण दूषित करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याचा इशारा शहर पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी दिला आहे.



याबाबतची हकीकत अशी, काल ईद-ए-मिलादच्या निमित्ताने मुस्लिम बांधवांची मिरवणूक सुरु असताना छत्रपती संभाजी महाराज चौकातील फ्लेक्सवरील संभाजी राजेंच्या फोटोची विटंबना झाल्याची चर्चा वाऱ्यासारखी पसरली. त्यानंतर हिंदुत्ववादी संघटना आक्रमक होऊन शेकडोचा जमाव पोलीस चौकीत दाखल झाला. त्यांनी छत्रपती संभाजी राजांच्या फ्लेक्सवरील फोटोसह अन्य फोटोची काही समाजकंटकांनी फाडतोड करुन विटंबना केली. अशा अज्ञात समाजकंटकांवर तात्काळ कठोर कारवाई करण्याची तक्रार दिली.

ही माहिती समजताच शहर पोलीस निरीक्षक नितीन देशमुख, सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश जाधव, समाधान सोलंकी, पोलीस उपनिरीक्षक सुधीर हापसे आदींनी फौज फाट्यासह घटनास्थळी दाखल प्राप्त माहितीची शहानिशा केली. त्यानंतर छत्रपती संभाजी महाराज यांचा फोटो असलेला फ्लेक्स सुरक्षित असून तो कुठेही फाटलेला नाही. विटंबना ही निव्वळ अफवा असल्याचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी माध्यमांना सांगितले. नागरिकांनी अशा निराधार अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहनही त्यांनी केले. तसेच अशा अफवा पसरवून सामाजिक वातावरण दूषित करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. तसेच प्राप्त झालेल्या तक्रारीची दखल घेऊन त्यानुसार कारवाई सुरु असल्याचेही त्यांनी सांगितले.

# विजेच्या प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी विवेक कोल्हेंची महावितरण अधिकाऱ्यांशी चर्चा



**कोपरगाव (प्रतिनिधी)–** कोपरगाव मतदारसंघातील विजेच्या तातडीच्या प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता संगमनेरचे प्रदीप वट्टमवार आणि शहर विभागाचे उपकार्यकारी अभियंता धनंजय धांडे यांनी युवानेते विवेक कोल्हे यांची सदिच्छा भेट घेतली.

या भेटीत कोपरगावातील विविध गावांमध्ये तसेच शहर विभागात वारंवार खंडित होणारी वीज, कमी दाबाचा पुरवठा आणि नवीन ट्रान्सफॉर्मरची आवश्यकता या महत्त्वाच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा झाली. कोल्हे यांनी स्थानिक नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणींवर प्रकाश टाकत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.

यावर कार्यकारी अभियंता वट्टमवार आणि उपअभियंता धांडे यांनी समस्यांचे गांभीर्य लक्षात घेतले असून आवश्यक तांत्रिक उपाययोजना आखून लवकरच सकारात्मक बदल घडवून आणण्याचे आश्वासन दिले. त्यांनी वीज वितरण यंत्रणेचे आधुनिकीकरण, तांत्रिक दुरुस्ती तसेच आवश्यक ठिकाणी नवीन ट्रान्सफॉर्मर व तारांबाबत तातडीने पावले उचलली जातील असे सांगितले. या चर्चेमुळे कोपरगाव मतदारसंघातील विजेच्या प्रश्नांवर लवकरच ठोस तोडगा निघेल अशी अपेक्षा व्यक्त होत असून नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. युवानेते विवेक कोल्हे यांनी लोकांच्या हितासाठी सातत्याने प्रयत्नशील राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

# विलास पटारे समाजभूषण पुरस्काराने सन्मानीत



**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** नेवासा तालुक्यातील सोनई येथील विलास पटारे यांना नुकतेच समाजभूषण पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.

श्रीरामपूर शासकीय विश्रामगृह येथे लोककला कलावंत साहित्यिक परिषद, महाराष्ट्र आयोजित डॉ. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे एकदिवसीय साहित्य संमेलनात त्यांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. प्रसंगी डॉ. बाबुराव उपाध्ये, सायमन भारस्कर, राजेंद्र फंड, काळूराम बोरुडे, पत्रकार प्रकाश कुलथे, विजय खंडागळे, रिपाइं जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष त्रिभुवन, वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष चरण त्रिभुवन, कवी रुपचंद शिदोरे, सुरेश वैरागर, कवी चंद्रकांत राऊत, विजय शेलार, राजेंद्र निंबाळकर, एस. के. सय्यद, प्रा. रवींद्र चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

# एकलहरे परिसरात सुगंधी पानमसाला पकडला

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील एकलहरे येथील आठवाडी परिसरात महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला सुगंधी पान मसाला व तंबाखू पकडल्याची कारवाई करण्यात आली. या कारवाईत तब्बल २ लाख ६ हजार १८४ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात एका जणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांना तालुक्यातील एकलहरे परिसरात आठवाडी येथे अमजद नौशाद सय्यद (वय ३०) हा महाराष्ट्रात प्रतिबंधीत असलेला सुगंधी पानमसाला व तंबाखू असा मुद्देमाल विक्री करण्यासाठी स्वत:च्या ताब्यात बाळगून असल्याची गुप्त माहिती मिळाली. सदर माहिती मिळाल्यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश जाधव यांच्या नेतृत्वाखालील पथकाने सदर ठिकाणी जाऊन छापा टाकला. त्यांना अमजद सय्यद याच्या घराच्या पोर्चमध्ये विमल ब्रॅण्डचा केसरयुक्त पान मसाला व तंबाखू असा मोठ्या प्रमाणात मुद्देमाल आढळून आला. तसेच घरामध्येही प्रतिबंधीत मुद्देमाल असल्याचा संशय आल्याने आरोपीच्या भावाच्या उपस्थितीत घराचे कुलूप उघडण्यात आले. घराची झडती घेतली असता तेथेही मोठ्या प्रमाणात सुगंधी पान मसाला व तंबाखू सापडली. सर्व मुद्देमाल पंचांच्या उपस्थितीत ताब्यात घेण्यात आला. पथकाने या कारवाईत २ लाख ०६ हजार १८४ रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे.

याप्रकरणी अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ व त्याखालील नियम व नियमने २०११ चे कलम २६(२)(iv), कलम २७(३)(d), कलम २७(३)(e) सहवाचन कलम ३०(२)(a) चे उल्लंघन केल्याप्रकरणी अमजद नौशाद सय्यद याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

श्रीरामपूर शहर पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी सांगितले की, राज्य सरकारने गुटखा, पान मसाला व तंबाखूजन्य पदार्थांवर घातलेला बंदी आदेश काटेकोरपणे अंमलात आणण्यासाठी पोलिसांकडून पुढील काळातही अशा प्रकारच्या कारवाया करण्यात येणार आहेत. नागरिकांनीही अशा अवैध व्यापाराविषयी पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

# काँग्रेस नेत्यांनी घेतली उद्धव ठाकरेंची भेट

**मुंबई (प्रतिनिधी)–** आगामी महापालिका निवडणुकीसाठी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र येणार असल्याची चर्चा असताना काँग्रेसच्या नेत्यांनी सोमवारी मातोश्रीवर जाऊन शिवेसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. या भेटीत महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद निवडणूक तसेच सद्य राजकीय घडामोडींवर चर्चा झाली.

येत्या काही महिन्यात राज्यात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका होऊ घातल्या आहेत. या निवडणुका महाविकास आघाडी म्हणून एकत्र लढवणार की वेगळी भूमिका घेणार याबाबत आघाडीच्या नेत्यांमध्ये कोणतीही स्पष्टता नाही. अशातच ठाकरे बंधू एकत्र निवडणूक लढणार असल्याने आघाडीच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर आजची भेट महत्वाची मानली जाते.

उद्धव ठाकरे यांना भेटणाऱ्या नेत्यांमध्ये माजी मंत्री बाळासाहेब थोरात, काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार, आमदार अमीन पटेल यांचा समावेश होता. आजच्या बैठकीत राज्यातील विविध महत्त्वाच्या विषयांवर विचारविनिमय झाला. राज्यातील राजकीय परिस्थिती अधिक समन्वयपूर्वक हाताळण्यासाठी आवश्यक त्या धोरणांवरही चर्चा झाल्याची माहिती थोरात यांनी दिली.

दरम्यान, उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्यात काय चर्चा झाली याच्याशी आमचा संबंध नाही. आम्ही आघाडीत आहोत. तिघांनी एकत्रित कसे पुढे जायचे याबाबत आज ठाकरेंसोबत चर्चा केली. आगामी महापालिका निवडणुकीत राज ठाकरे यांना सोबत घ्यायचे किंवा नाही याबाबतचा निर्णय आमच्या दिल्लीतील पक्षश्रेष्ठींच्या पातळीवरच होईल. मी याबाबत आताच काही सांगू शकत नाही, असेही वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले.

# देशातील पहिली डिजिटल जनगणना; ३४ लाख जनगणना कर्मचारी

**नवी दिल्ली–** पुढील वर्षी सुरू होणारी जनगणना ही देशातील पहिली पूर्णपणे डिजिटल जनगणना ठरणार आहे. यासाठी तब्बल ३४ लाख जनगणना कर्मचारी पहिल्यांदाच त्यांच्या स्वतःच्या स्मार्टफोनच्या माध्यमातून माहिती संकलनाचे काम करतील. मिळालेल्या माहितीनुसार, भारताचे रजिस्ट्रार जनरल यांनी नियुक्त केलेले पर्यवेक्षक आणि कर्मचारी हे जनगणनेचे सर्व काम अँड्रॉइड किंवा आयओएस ऑपरेटिंग सिस्टमवर चालणाऱ्या फोनवरून करतील. विशेष ॲपच्या मदतीने संकलित माहिती थेट केंद्रीय सर्व्हरवर हस्तांतरित केली जाणार आहे. ही प्रक्रिया पारंपरिक कागदी पद्धतीऐवजी पूर्णपणे डिजिटल पद्धतीने होणार असल्यामुळे, जनगणना अधिक वेगवान, अचूक आणि सुरक्षित होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

एका इंग्रजी वृत्तवाहिनीच्या वृत्तानुसार, जनगणना करणारे सर्व कर्मचारी या प्रक्रियेत मोबाईल ॲप्लिकेशनचा वापर करणार आहेत. हे ॲप्लिकेशन

## मोबाईल ॲप्लिकेशनचा वापर

२०२१ च्या जनगणनेच्या कामासाठी विकसित करण्यात आले होते. हे ॲप्लिकेशन अँड्रॉइड आणि आयओएस दोन्ही ऑपरेटिंग सिस्टम असलेल्या फोन्सला सपोर्ट करतील. विशेष बाब म्हणजे हे ॲप्स इंग्रजी तसेच इतर प्रादेशिक भाषांमध्येही उपलब्ध करून देण्यात आले आहेत. चार वर्षे जुन्या या ॲप्लिकेशनमध्ये आता अनेक तांत्रिक सुधारणाही करण्यात आल्या आहेत. या सुधारणांमुळे कोणताही जनगणना कर्मचारी ते सहज आणि सोप्या पद्धतीने ऑपरेट करू शकेल आणि त्यात जनगणनेसाठी डेटा अपलोड करू शकेल.

**सर्व इमारतींचे प्रथमच जिओ- टॅगिंग**

२०११ मध्ये झालेल्या सामाजिक-आर्थिक जातींच्या जनगणनेदरम्यान, जनगणना कर्मचाऱ्यांनी कोणत्याही कागद न हाताळता काम केले होते. पण त्यावेळी जनगणना कर्मचाऱ्यांना टॅब्लेट देण्यात आले होते. भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड (इएङ) या कंपनीच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांना हे टॅब्लेट देण्यात आले होते. पण यंदाची जनगणना पूर्णपणे डिजिटल पद्धतीने होणार असून २०२७ च्या जनगणनेत प्रथमच, सर्व निवासी आणि अनिवासी इमारती जिओ-टॅग केल्या जातील.

**सर्व डेटा कर्मचारी पातळीवरच डिजिटल**

याशिवाय अहवालानुसर, जर काही कारणास्तव जनगणना कर्मचारी कागदावर कोणताही डेटा गोळा करत असेल, तर त्याला तो एका समर्पित वेब पोर्टलवर अपलोड करावा लागेल जेणेकरून नंतर तो स्कॅन करण्याची किंवा तो डेटा प्रविष्ट करण्याची आवश्यकता राहणार नाही. म्हणजेच, जनगणनेच्या कामात गुंतलेल्या कर्मचाऱ्यांच्या पातळीवर सर्व प्रकारच्या जनगणनेचा डेटा डिजिटल करण्याची ही पहिलीच वेळ असेल. यामुळे, जनगणनेचे निकाल लवकरच येण्याची शक्यता आहे.

# पान १ वरुन

## आंदोलनकर्ते मनोज जरांगेंचा...

दिलंय. मी तिथेच बोली करुन घेतली आहे की, चुकलं तर जीआरमध्ये बदल करुन द्यायचा. ते हो म्हणाले आहेत. याला म्हणतात मराठ्यांच्या गरिबाचा धसका, असं मनोज जरांगे पाटील म्हणाले. आपण एका लाईनवर क्लिअर राहायचं. तुम्ही म्हणाले हैदराबादचे गॅझेट लागू करु. त्यामुळे आता प्रमाणपत्र द्या. आरक्षण मिळेल. नाही मिळालं तर त्यांचं सगळं बंद होईल, असा इशारा त्यांनी पुन्हा दिला.

## न्यायालयीन, रस्त्यावरील लढाई...

राज्य सरकारने हैदराबाद गॅझेटच्या अंमलबजावणीबाबत शासन निर्णय जारी केला आहे. या निर्णयामुळे मराठा समाज मोठ्या संख्येने ओबीसी आरक्षणाचा लाभ घेईल, अशी भीती व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांच्या उपस्थितीत आज यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे ओबीसी संघटनांची बैठक पार पडली. बैठकीत राज्य सरकारच्या निर्णयाला विरोध करण्यासाठी न्यायालयीन आणि रस्त्यावरील लढाई लढण्याचा पवित्रा संघटनेने घेतला.

या बैठकीनंतर बोलताना वडेट्टीवार यांनी राज्य सरकारच्या निर्णयाच्या विरोधात ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात नागपुरात ओबीसींचा महामोर्चा काढणार आल्याची माहिती दिली. तसेच विविध ओबीसी संघटना या आठवड्यात न्यायालयात याचिका देखील दाखल करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आरक्षण हा सगळ्यांचा अधिकार आहे. ज्यांच्याकडे नोंदी आहेत त्यांना आमचा विरोध नाही. पण सरसकट आरक्षण देणे हे योग्य नाही. सरकारने काढलेल्या शासन निर्णयाने मूळ ओबीसींच्या हक्कावर गदा येणार आहे. त्यामुळे आता रस्त्यावर आणि न्यायालयीन लढाई लढण्याची तयारी करावी लागेल, असे वडेट्टीवार म्हणाले.

ओबीसी समाजासाठी आंदोलन करत असताना सगळ्यांनी आपल्या पक्षाची पादत्राणे बाहेर ठेवून यावे. ओबीसी समाजासाठी लढणाऱ्या प्रत्येकाला साथ द्यावी. महायुती सरकार हे दोन समाजात भांडण लावत आहे. राज्य कंगाल झाले आहे. शेतकरी, कंत्राटदार आत्महत्या करत आहेत. या प्रश्नांवरून लक्ष हटवण्यासाठी सरकार मराठा विरुद्ध ओबीसी भांडण लावत असल्याचा गंभीर आरोप वडेट्टीवार यांनी यावेळी केला.

**निर्णयाविरोधात विभागवार आंदोलन**

राज्य सरकारच्या निर्णयाविरोधात विभागवार आंदोलन करण्याची तयारी सकल ओबीसी समाजाच्या आजच्या बैठकीत विविध संघटनांनी दर्शवली. याबाबत जिल्हा स्तरावर बैठका घेऊन आंदोलनाचे नियोजन करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला.

## बंजारा समाज देखील एसटीतील...

मराठा समाज आणि ओबीसी समाज आमने-सामने आला असतानाच आता मोठी बातमी समोर येत आहे ती म्हणजे आता बंजारा समाज देखील एसटीतील आरक्षणासाठी एकवटला आहे.

बीड शहरात काल जिल्ह्यातील बंजारा समाजाची व्यापक बैठक संपन्न झाली. आजच्या बैठकीमध्ये काही महत्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. यामध्ये हैदराबाद गॅझेटनुसार एसटी आरक्षणात बंजारा समाजाचा समावेश करावा या प्रमुख मागणीचा समावेश आहे. त्यासाठी आता १५ सप्टेंबर रोजी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते जिल्हाधिकारी कार्यालय बीड असा विराट मोर्चा समाजाच्या वतीनं काढण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आमच्या आरक्षणाचा प्रश्न तात्काळ मार्गी लावावा, अन्यथा महाराष्ट्रातील सगळे रस्ते आम्ही बंद करू असा इशारा यावेळी बंजारा समाजाकडून देण्यात आला आहे. दरम्यान बाजारा समाजानं दिलेल्या या इशाऱ्यानंतर आता राज्यात पुन्हा एकदा वातावरण तापण्याची शक्यता आहे.

एकीकडे राज्यात हैदराबाद गॅझेटचा जीआर काढण्यात आल्यानंतर ओबीसी समाज आक्रमक झाला आहे, तर दुसरीकडे आता बंजारा समाज देखील आरक्षणासाठी रस्त्यावर उतरला आहे. हैदराबाद गॅझेटनुसार समाजाला एसटीमधून आरक्षण मिळावं अशी त्यांची मागणी आहे. त्यासाठी समाजाच्या वतीनं आंदोलनाचा इशारा देखील देण्यात आला आहे.

## नातवंडासोबत आजोबांना द्यावी...

कार्यवाही करण्यासंदर्भात शासनाकडून मार्गदर्शन मागविले आहे. शिक्षकांमध्ये दुसरीकडे संभ्रम असून वयाची ५० पार केलेल्या शिक्षकांना आता त्यांच्या नातवंडासोबत टीईटीची परीक्षा द्यावी लागणार आहे. त्यासाठी अवघ्या दोन संधी देण्यात आल्या आहेत. राज्यात प्राथमिक शाळांची संख्या ६५ हजार ८० तर उच्च प्राथमिक शाळांची संख्या २२ हजार ३६० इतकी आहे. या शाळांवर सुमारे पावणेपाच लाख शिक्षक असून त्यातील २०१३ पूर्वीच्या सर्व शिक्षकांना (ज्यांचे वय ५३ वर्षांपर्यंत आहे असे) देखील टीईटी उत्तीर्ण व्हावी लागणार आहे. प्राथमिक शिक्षकांसाठी सर्वोच्च न्यायालयाने टीईटी बंधनकारक असल्याचा निकाल दिला आहे. ११० पानांचा तो आदेश असून त्यावर अभ्यास करून शासनाकडून आदेश प्राप्त होतील. त्यानुसार आम्ही कार्यवाही करणार आहोत. परंतु, फेब्रुवारी २०१३ पूर्वीच्या शिक्षक सेवेत येताना त्यांना ही अट व शर्त लागू नव्हती. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर महाराष्ट्र शासन आपले म्हणणे सादर करेल, असे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

**राज्यातील प्राथमिक शाळांची स्थिती**

**एकूण शाळा : ८७ हजार ४४०**

**शिक्षकांची एकूण संख्या : ४.७९ लाख**

**टीईटी द्यावी लागणारे शिक्षक :**

**अंदाजे दीड लाख टीईटी उत्तीर्णसाठी मुदत**

**शिक्षकांची पदोन्नती आता टीईटी वरच**

शिक्षण सेवकांना तीन वर्षानंतर उपशिक्षक म्हणून संधी मिळते. त्यानंतर सहशिक्षक, पदवीधर शिक्षक, मुख्याध्यापक आणि पुढे देखील पदोन्नती मिळतात.इपदोन्नतीच्या प्रत्येक टप्प्यावर मफ्टीईटीफम्ची अट घालण्यात आल्याने सेवाज्येष्ठ शिक्षकांऐवजी टीईटी उत्तीर्ण असलेला ज्युनिअर शिक्षक मुख्याध्यापक होणार आहे. त्याला शिक्षक व शिक्षक संघटनांनी विरोध केला आहे. या पार्श्वभूमीवर त्या नियमावली संदर्भात शासनाने धोरण निश्चित करावे, असा पत्रव्यवहार शालेय शिक्षण विभागाकडून करण्यात आला आहे.

## टीईटीविरोधात शिक्षकांची...

केंद्र सरकारकडे ठोस मार्ग काढण्याचे निवेदन दिले जाणार आहे. तसेच, आंदोलनाची जोरदार तयारी सुरू असल्याचे कोकण विभागाचे अध्यक्ष गुलाबराव पाटील यांनी स्पष्ट केले.

## विधिमंडळाला विरोधी पक्षनेत्याची...

नाही. अलीकडच्या काळात अधिवेशन सुरू नसताना २०२२ मध्ये विधान परिषदेत अंबादास दानवे तर २००५ साली विधानसभेत रामदास कदम यांची विरोधी पक्षनेता म्हणून निवड करण्यात आली होती, अशी माहिती विधानभवनाच्या सूत्रांनी दिली.

काँग्रेसने विधानसभेत विरोधी पक्षनेतेपदासाठी शिवसेना ठाकरे गटाचे आमदार भास्कर जाधव यांच्या नावाला पाठिंबा दिला आहे. त्यामुळे विधान परिषदेतील विरोधी पक्षनेतेपद मिळण्यात काँग्रेसला अडचण नाही. ठाकरे गटाने ४ मार्च २०२५ रोजी विधानसभा अध्यक्षांना पत्र देऊन विरोधी पक्षनेतेपदासाठी भास्कर जाधव यांच्या नावाची शिफारस केली आहे. परंतु, आज सहा महिने उलटूनही अध्यक्ष नार्वेकर यांनी जाधव यांच्या निवडीवर निर्णय घेतलेला नाही. विधानसभेप्रमाणे विधान परिषद विरोधी पक्षनेतेपदाचा निर्णय लांबणीवर पडू नये म्हणून काँग्रेसने हालचाली सुरू केल्या आहेत. दरम्यान, काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, आमदार अमीन पटेल यांनी सोमवारी म मातोश्रीफ वर जाऊन शिवसेना ठाकरे गटाचे नेते उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. त्यानंतर या नेत्यांनी प्रा. राम शिंदे यांची भेट घेऊन विधान परिषदेतील विरोधी पक्षनेतेपदाबाबत चर्चा केली.

**विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते पद सध्या रिक्त आहे. या पदाबाबत आम्ही आज उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा केली. शरद पवार मुंबईत आल्यानंतर त्यांच्याशीही चर्चा करू आणि निर्णय घेऊ**

**–विजय वडेट्टीवार,** नेते, काँग्रेस विधिमंडळ पक्ष

## उपराष्ट्रपतीपदासाठी आज मतदान

दोन्ही सभागृहात मिळून भाजप प्रणित एनडीएकडे ४२५ खासदारांचा पाठिंबा आहे. याशिवाय आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री जगन मोहन रेड्डी यांच्या वायएसआर काँग्रेसनं राधाकृष्णन यांना पाठिंबा जाहीर केला आहे. संसदेत त्यांचे ११ खासदार आहेत. याचा अर्थ एनडीएचं संख्याबळ ४३६ पर्यंत जातं. त्यामुळे महाराष्ट्राचे राज्यपाल राधाकृष्णन यांचा विजय निश्चित मानला जात आहे. नवीन पटनायक, चंद्रशेखर राव आणि जगन मोहन रेड्डी या ३ माजी मुख्यमंत्र्यांनी घेतलेली भूमिका एनडीएच्या पथ्थ्यावर पडणार आहे.